COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३**

# महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७

**(दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत सुधारलेला)**

MAHARASHTRA ACT No. III OF 1978

# THE MAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS (CONDITIONS OF SERVICE) REGULATION ACT, 1977

***(As modified upto 30th June, 2015)***

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ले. सा. भांडार, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

**2015**

**(किंमत : -००)**

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

# महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७

---

अनुक्रमणिका

**उद्देशिका :**


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. .. .. .. | १ |
| २. | व्याख्या .. .. .. .. .. .. | १ |
| ३. | अधिनियम लागू होणे .. .. .. .. .. | ४ |
| ४. | खाजगी शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती .. .. | ५ |
| ४ अ. | चौकशी करण्याचा किंवा चौकशी करण्याबाबत आदेश देण्याचा संचालकांचा अधिकार .. | ६ |
| ५. | खाजगी शाळांच्या व्यवस्थापनावरील विवक्षित आवंधने .. .. | ७ |
| ६. | खाजगी शाळांच्या मुख्याध्यापकांवरील आावंधने .. .. .. | ८ |
| ७. | खाजगी शाळांच्या कर्मचाऱ्यांनी राजीनामा देण्याची कार्यपद्धती .. .. | ८ |
| ८. | शाळा न्यायाधिकरणांची वडण. .. .. .. .. | ९ |
| ९. | खाजगी शाळांच्या कर्मचाऱ्यांचा न्यायाधिकरणाकडे अपील करण्याचा हक्क .. | |
| १०. | न्यायाधिकरणाचे सर्वसनधारण अधिकार व कार्यपद्धती .. .. | १० |
| ११. | योग्य तो अनुतोष व निदेश देण्याचे न्यायाधिकरणाचे अधिकार .. .. | १० |
| १२. | न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम व बंधनकारक असणे .. .. | ११ |
| १३. | न्यायाधिकरणाचा निदेशांचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल व्यवस्थापनास शास्ती .. .. | १२ |
| १४. | विधि व्यवसनयींना उपस्थित राहण्यापासून वगळणे .. .. .. | १३ |
| १५. | प्रलंबित अपिले न्यायाधिकरणाकडे हस्तांतरित करणे .. .. | १३ |
| १६. | नियम .. .. .. .. .. .. | १४ |

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम ३[१]

## [महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७]

[या अधिनियमास दिनांक १६ मार्च, १९७८ रोजी राष्ट्रपतींची अनुमती मिळाली, या अनुमतीनंतर दिनांक २० मार्च, १९७८ च्या **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग चारमध्ये प्रथम तो (इंग्रजीत) प्रसिद्ध करण्यात आला.]

या अधिनियमांत पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या :--

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०. (७-८-१९८७)*
सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३. (२-६-१९८९)*
सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२. (१७-१२-१९९०)*
सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७. (१८-८-१९९५)*
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमाकं ३७. (६-८-१९९७)*
सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४. (३०-४-२००७)*@
सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. (१४-५-२०१२)*#

### विवक्षित खाजगी शाळांतील कर्मचाऱ्यांचा सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती यांचे विनियमन करण्यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी,** राज्यातील विवक्षित खाजगी शाळातील कर्मचाऱ्यांना, विशेषतः विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या पालकांच्या संबंधातील आणि एकंदरीत परिसंस्थेच्या व समाजाच्या संबंधातील त्यांची कर्तव्ये परिणामकारकरित्या व कार्यक्षमरित्या पार पाडणे शक्य व्हावे म्हणून, त्यांना सेवेत शाश्वती व स्थैर्य मिळवून देण्याच्या दृष्टीने, अशा कर्मचाऱ्यांचा सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती यांचे विनियमन करणे इष्ट आहे;

**आणि ज्याअर्थी,** असे कर्मचारी, व्यवस्थापनास जबाबदार राहतील आणि शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास ते हातभार लावतील याची निश्चिती करण्याकरिता सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अशा कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व कार्ये ठरवून देणे देखील इष्ट आहे;

**आणि ज्याअर्थी,** विवक्षित पूरक, आनुषंगिक व परिणामस्वरूप तरतुदी करणेही आवश्यक आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठाविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ असे म्हणावे.

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन, यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९७७ भाग पाच, असाधारण पृष्ठ ३१९ (इंग्रजी) पहा.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचे दिनांक दर्शविते.

*@ सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ चे कलम १२ पुढीलप्रमाणे :--

१९७८ चा महा. ३. — शिक्षण सेवकांच्या नियुक्त्यांचे विनियमन व व्यावृत्ती.

**१२.** (१) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण क्रमांक १२, भाग एक-मध्य उप-विभाग, दिनांक १५ फेब्रुवारी, २००७ मध्ये प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयाच्या तरतुदींनुसार नियुक्त केलेल सर्व शिक्षणसेवक हे, यापूर्वी किंवा, यथास्थिति, यानंतर शिक्षणसेवक म्हणून तीन वर्षांची सेवा पूर्ण केल्यावर शिक्षक म्हणून नियुक्त करण्यासाठी पायाभूत संवर्गातील शिक्षणसेवक म्हणून उक्त अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

२००७ चा महा. १४.

(२) मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) अधिनियम, २००७ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, शासनाने वेळोवेळी काढलेल्या शासन निर्णयाद्वारे शिक्षणसेवकाच्या नियुक्तीकरिता विहित केलेल्या अटी व शर्ती या, जोपर्यंत त्यामध्ये फेरबदल करण्यात येत नाही किंवा त्या रद्द करण्यात येत नाहीत तोपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

*# सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ९ चे कलम १२ पुढीलप्रमाणे :—

२०१२ चा महा. ९. — व्यावृत्ती.

**१२.** मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) अधिनियम, २०११ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, शासनाने वेळोवेळी शासन निर्णय किंवा आदेश काढून त्याद्वारे शिक्षणसेवकांच्या नियुक्तीकरिता विहित केलेल्या अटी व शर्तींमध्ये जोपर्यंत शासनाकडून फेरबदल करण्यात येत नाही किंवा त्या रद्द करण्यात येत नाहीत, तोपर्यंत त्या अंमलात असण्याचे चालू राहील.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचने अन्वये नेमील अशा दिनांकास** अंमलात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(१) "नेमलेला दिनांक" याचा अर्थ, ज्या दिनांकास हा अधिनियम अमलात येईल तो दिनांक असा आहे.

(२) "खास शिक्षण वर्ग" याचा अर्थ, कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींच्या निकायाने आपल्या विद्यार्थ्यांची, कोणत्याही प्रमाणपत्राच्या किंवा पदविकेच्या किंवा पदवीच्या किंवा कोणत्याही महाविद्यालयीन किंवा शालेय पाठ्यक्रमांकरिता तयारी करून घेण्याच्या हेतूने स्थापन केलेली व प्रशासित केलेली, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी, मान्यताप्राप्त शाळेहून अन्य अशी कोणतीही परिसंस्था असा आहे ;

(३) "महाविद्यालय" याचा अर्थ, राज्यात कायद्याने स्थापन झालेल्या विद्यापीठाकडून चालवण्यात येणारे किंवा त्यांस संलग्न असणारे महाविद्यालय असा आहे;

(४) "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा शिक्षण विभाग असा आहे ;

[१] [(५) "उपसंचालक" याचा अर्थ, राज्य शासनाने संबंधित प्रदेशासाठी किंवा क्षेत्रासाठी नेमलेला शिक्षण उपसंचालक, तंत्रशिक्षण उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण उपसंचालक किंवा यथास्थिती, कला उपसंचालक असा आहे] ;

(६) "संचालक" याचा अर्थ, राज्य शासनाने नेमलेला यथास्थिती, शिक्षण संचालक किंवा तंत्रशिक्षण संचालक [२][किंवा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालक] [३] [किंवा कला संचालक] असा आहे ;

[४] [(६अ) "विभागीय मंडळ" याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन करण्यात आलेले विभागीय मंडळ, असा आहे] ;

(७) "कर्मचारी" याचा अर्थ, मान्यताप्राप्त शाळेतील अध्यापनविषयक व अध्यापकेतर कर्मचारी वर्गातील कोणतीही व्यक्ती असा आहे [५] [आणि त्यामध्ये [६] [सहायक शिक्षक (परिवीक्षाधीन) यांचा [समावेश होतो].

(८) "विद्यमान खाजगी शाळा" याचा अर्थ, नेमलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली मान्यताप्राप्त खाजगी शाळा असा आहे ;

(९) "शाळा प्रमुख" किंवा "प्रमुख" याचा अर्थ, कोणत्याही व्यवस्थापनाने चालवलेल्या आणि या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त असलेल्या किंवा मान्यताप्राप्त असल्याचे मानण्यात येणाऱ्या शाळेची विद्याविषयक व प्रशासनिक कर्तव्ये व कार्ये यांची प्रभारी असलेली, कोणत्याही नावाने, संबोधण्यात येणारी व्यक्ती असा आहे आणि त्यात शाळेचा प्राचार्य, उप प्राचार्य, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, सहायक मुख्याध्यापक, सहायक मुख्याध्यापिका किंवा अधीक्षक यांचा समावेश होतो ;

(१०) "शिक्षणशास्त्र विद्यालय" याचा अर्थ, शाळापूर्व केंद्रांत किंवा प्राथमिक शाळांमध्ये ज्यांना शिक्षक [७][आणि [६][सहायक शिक्षक (परिवीक्षाधीन) यांचा] ] म्हणून नेमावयाचे असेल अशा व्यक्तींना शिक्षकांचे शिक्षण देणारी शाळा असा आहे ;

---

** दिनांक १५ जुलै १९८१, शासकीय अधिसूचना, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक एसटीआर-१९८१/एसइ-३-शाखा, दिनांक १० जुलै, १९८१ पहा.

१. सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ (अ) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

२. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम २ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम २ (अ) अन्वये खंड ६ क समाविष्ट करण्यात आला.

५. सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १० (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६. सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम १० (क) अन्वये "शिक्षणसेवकांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम १० (ख) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(११) "स्थानिक प्राधिकरण" याचा अर्थ, जिल्हा परिषद, महानगरपालिका किंवा यथास्थिती, नगरपालिका परिषद असा आहे ;

(१२) एखाद्या शाळेच्या संबंधात "व्यवस्थापन" याचा अर्थ, --

(अ) राज्य शासनाकडून प्रशासन करण्यात येते अशा शाळेच्या संबंधात, विभाग ;

(ब) स्थानिक प्राधिकरणाकडून प्रशासन करण्यात येते अशा शाळेच्या संबंधात ते स्थानिक प्राधिकरण ; आणि

(क) इतर कोणत्याही बाबतीत, अशा शाळेचे प्रशासन करणारी व्यक्ती अथवा कोणत्याही नावाने संबोधला जाणारा व्यक्तींचा निकाय-मग तो कायद्याने संस्थापित असो किंवा नसो ; असा आहे ;

(१३) "अल्पसंख्यांक शाळा" याचा अर्थ, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३०, खंड (१) अन्वये तसे करण्याचा हक्क असलेल्या अल्पसंख्यांकानी स्थापन केलेली व त्याचे प्रशासन असलेली शाळा असा आहे ;

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

(१४) "महानगरपालिका" याचा अर्थ, मुंबई महानगरपालिका अधिनियम, किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये स्थापन केलेली किंवा घटित केलेली महानगरपालिका असा आहे ;

१९६५ चा महा. ४०.

(१५) "नगरपालिका परिषद" याचा अर्थ, महाराष्ट्र [1] [नगरपालिका परिषद] अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन केलेली किंवा घटित केलेली नगरपालिका परिषद असा आहे ;

(१६) "शाळापूर्व केंद्र" याचा अर्थ, तीन वर्षे वय पूर्ण झालेल्या परंतु सहा वर्षे वय पूर्ण न झालेल्या मुलांना शिक्षण देणारी, कोणत्याही नावने संबोधली जाणारी परिसंस्था असा आहे ;

(१७) "विहित" याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेली असा आहे ;

(१८) "प्राथमिक शिक्षण" याचा अर्थ, राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील अशा विषयांचे व अशा इयत्तांपर्यंत प्राथमिक व माध्यमिक शाळेतून देण्यात येणारे शिक्षण असा आहे ;

(१९) "प्राथमिक शाळा" याचा अर्थ, जेथे प्राथमिक शिक्षण दिले जाते अशी शाळा किंवा अशा शाळेचा भाग असा आहे ;

[2] [(२०) "खाजगी शाळा" याचा अर्थ, शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याव्यतिरिक्त अन्य व्यवस्थापनाने, स्थापन केलेली किंवा प्रशासन केलेली मान्यताप्राप्त शाळा असा आहे]* ;

---

१. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम २ अन्वये "नगरपालिका" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम २ अन्वये खंड (२०) दिनांक ७-८-१९८७ पासून बदली दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

* सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ४ पुढीलप्रमाणे वाचावे :-- सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २(२०) याची भूतलक्षी प्रभावाने सुधारणा.

४. याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, या अधिनियमाच्या कलम २ द्वारे, मुख्य अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (२०) च्या तरतुदी भूतलक्षी प्रभावाने सुधारण्यात आल्यामुळे स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने दिनांक ७ ऑगस्ट १९८७ पूर्वी कलम ९ च्या खंड (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींशी संबंधित कोणतीही अपिले केली असतील तर ती निकालात काढण्यास सक्षम असलेले अपील प्राधिकरण ती निकालात काढील आणि तसेच, जर स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने ७ ऑगस्ट, १९८७ रोजी किंवा त्यानंतर न्यायाधिकरणापुढे अशा प्रकारची कोणतीही अपिले दाखल केली तर ती, मुख्य अधिनियमाच्या कलम २ चा खंड (२०) हा जणूकाही या अधिनियमान्वये सुधारण्यात आल्याप्रमाणे अमलात असावा व तो सतत अमलात असण्याचे चालू होता असे समजून निकालात काढण्यापूर्वी सक्षम अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्यात येतील.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



[१][(२१) "मान्यताप्राप्त" याचा अर्थ, संचालकांकडून, विभागीय मंडळाकडून किंवा राज्य मंडळाकडून किंवा त्याने किंवा अशा कोणत्याही मंडळाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून मान्यताप्राप्त असा आहे] ;

[२][* * * *]

(२३) "नियम" याचा अर्थ, राज्य शासनाने या अधिनियमान्वये केलेले नियम असा आहे ;

[३][(२४) "शाळा" याचा अर्थ, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, शिक्षणशास्त्र विद्यालय किंवा कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी इतर कोणतीही परिसंस्था असा असून यामध्ये तांत्रिक, व्यावसायिक किंवा कला परिसंस्था किंवा सर्वसाधारण, तांत्रिक, व्यावसायिक कलाविषयक किंवा यथास्थिती, विशेष शिक्षण देणाऱ्या अथवा कोणतीही विद्याशाखा किंवा ज्ञानशाखा किंवा विषय यांच्या पदवीपेक्षा निम्नस्तराचे शिक्षण देणाऱ्या अशा कोणत्याही शाळेचा, महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा भाग यांचा समावेश होतो ;

[४][(२४ क) "शिक्षणसेवक" याचा अर्थ, परिणामतः शिक्षक म्हणून नियुक्त करण्यासाठी, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्रमांक १२, भाग एक-मध्य उप-विभाग, दिनांक १५ फेब्रुवारी, २००७ मध्ये प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयात विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तींना अधीन राहून, मानधनावर नियुक्त केलेला पायाभूत शिक्षक संवर्गातील सदस्य, असा आहे ;]

(२५) "राज्य मंडळ" याचा अर्थ,--

(क) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ; १९६५ चा महा. ४१.

(ख) तंत्र परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य ;

(ग) महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ ; किंवा

(घ) कला परीक्षा समिती ; असा आहे ;

(२६) "शिक्षक" याचा अर्थ, अध्यापक वर्गातील व्यक्ती असा आहे आणि त्यात शाळाप्रमुखाचा समावेश होतो ;

(२७) "जिल्हा परिषद" याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन केलेली किंवा घटित केलेली जिल्हा परिषद ; असा आहे ; १९६२ चा महा. ५.

अधिनियम लागू होणे.

**३.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी महाराष्ट्र राज्यातील सर्व खाजगी शाळांना लागू होतील, मग त्यांना राज्य शासनाकडून कोणतेही सहायक अनुदान मिळत असो किंवा नसो.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमातील तरतुदी या, [५][अल्पसंख्यांक शाळेचा प्रमुख आणि] ज्या व्यक्ती अशा शाळेत कामावर लावलेल्या आहेत आणि या प्रयोजनासाठी व्यवस्थापनाने ज्यांची नावे [६][संचालकांकडे किंवा यथास्थिती] उप-संचालकांकडे अधिसूचित केलेली आहेत अशा इतर कोणत्याही व्यक्ती (तीनपेक्षा अधिक नसतील अशा) यांच्या सेवाप्रवेशास लागू होणार नाहीत.

---

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ (ड) अन्वये खंड (२१) बदली दाखल करण्यात आला.

[२] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम २ (ड) अन्वये खंड (२२) वगळण्यात आला.

[३] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ (इ) अन्वये मूळ खंडाऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

[४] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १० (ग) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ३ अन्वये "अल्पसंख्यांक शाळेचा प्रमुख किंवा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला आणि "सेवेच्या शर्ती आणि वर्तणूक व शिस्त यांना" हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ अन्वये "ज्यांची नावे" या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



खाजगी शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.

**४.** (१) या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून राज्य शासनास, खाजगी शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवाप्रवेशासाठी (त्यांच्या कार्यपद्धतीसह) किमान अर्हता व त्यांची कर्तव्ये, वेतन, भत्ते, सेवानिवृत्तीनंतरचे व इतर लाभ आणि सेवेच्या इतर शर्ती यांची आणि मागासवर्गातील व्यक्तींना पुरेशा संख्येत पदे राखून ठेवण्याची तरतूद करणारे नियम करता येतील.

परंतु, नेमलेल्या दिनांकाला अस्तित्वात असलेल्या खाजगी शाळांच्या सेवेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनात किंवा अनुपस्थितीची परवानगी, सेवानिवृत्तीचे वय आणि सेवानिवृत्तीनंतरचे लाभ व इतर आर्थिक लाभ यांच्या बाबतीतील त्यांच्या हक्कात अशा कर्मचाऱ्याला अहितकारक होईल अशा प्रकारे बदल केला जाणार नाही.

(२) खाजगी शाळेतील प्रत्येक कर्मचाऱ्यास, विहित करण्यात येईल अशी आचारसंहिता लागू असेल ; अशा आचारसंहितेच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन केल्यावर, विहित करण्यात येईल अशा रीतीने चौकशी करण्यात आल्यानंतर शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास तो कर्मचारी पात्र ठरेल.

(३) कोणत्याही खाजगी शाळांमधील कर्मचाऱ्यांची वेतनमाने व भत्ते, सेवानिवृत्तीनंतरचे व इतर लाभ, हे पोट-कलम (१) अन्वये केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात आलेली वेतनमाने व भत्ते, सेवानिवृत्तीनंतरचे इतर लाभ यापेक्षा कमी अनुकूल असतील त्याबाबतीत संचालक तो विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत किंवा अशा वाढविलेल्या कालावधीत ते उक्त नियमांद्वारे तरतूद करण्यात आली असेल अशा पातळीपर्यंत आणण्याचा, लेखी निदेश अशा शाळांच्या व्यवस्थापनांना देईल.

(४) पोट-कलम (३) अनुसार संचालकाने दिलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करण्यात कसूर झाल्यास त्याच्या परिणामी, त्या शाळेची मान्यता काढून घेतली जाऊ शकेल ; परंतु संबंधित शाळेच्या व्यवस्थापनास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज कोणत्याही शाळेची मान्यता काढून घेता येणार नाही.

(५) खाजगी शाळेत काम करणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याला कोणत्याही खास शिक्षण वर्गात काम करता येणार नाही. या तरतुदींचे उल्लंघन करून कोणत्याही कर्मचाऱ्याने खास शिक्षण वर्गात काम केल्यास त्याची सेवा व्यवस्थापनाकडून समाप्त केली जाण्यास तो पात्र ठरेल. परंतु, त्या कर्मचाऱ्याला स्वतःची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असा सेवासमाप्तीचा आदेश काढण्यात येणार नाही.

(६) या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली त्याबाबतीत करण्यात आलेले नियम यानुसार असेल त्या व्यतिरिक्त, व्यवस्थापन खाजगी शाळेतील कोणत्याही कर्मचाऱ्याला निलंबित करणार नाही, बडतर्फ करणार नाही किंवा सेवेतून काढून टाकणार नाही किंवा अन्य प्रकारे त्याची सेवा समाप्त करणार नाही किंवा त्याला खालच्या दर्जावर आणणार नाही.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



चौकशी करण्याचा किंवा चौकशी करण्याबाबत आदेश देण्याचा संचालकाचा अधिकार.

[१][४-अ (१) या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (६) मध्ये किंवा अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, एखाद्या कर्मचाऱ्याच्या अभिकथित गंभीर स्वरूपाच्या गैरवर्तनाच्या किंवा गैरवर्तणुकीच्या किंवा नैतिक अध:पतनाच्या कोणत्याही प्रकरणांमध्ये--

(अ) चौकशी समितीकडून अशा अभिकथनांची चौकशी करण्यात आली असेल आणि संचालकांचे जर असे मत झाले असेल की चौकशी समितीने त्या कर्मचाऱ्याला अवाजवीरीत्या निर्दोष ठरविलेले आहे, तर तो निष्कर्षाच्या आधारे केलेल्या निर्णयाच्या अचूकतेबाबत स्वत:ची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी अशा चौकशीचा अभिलेख व कामकाज याबाबतची कागदपत्रे मागवून घेऊ शकेल व त्यांची तपासणी करू शकेल व उक्त निर्णय रद्द करू शकेल, बदलू शकेल, त्यामध्ये फेरबदल करू शकेल किंवा तो कायम करू शकेल किंवा त्यास आवश्यक वाटेल असा जादा पुरावा मिळविण्यासाठी अधिक चौकशी करण्याबाबत चौकशी समितीला निदेश देऊ शकेल किंवा असा जादा पुरावा स्वत: मिळवू शकेल किंवा तो मिळविण्यासाठी शिक्षण अधिकाऱ्यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याला प्राधिकृत करू शकेल आणि या खंडा अन्वये आदेश काढताना, संचालकाची अशी खात्री झालेली असेल की, गंभीर स्वरूपाचे गैरवर्तन, गैरवर्तणूक किंवा यथास्थिती, नैतिक अध:पतन याबद्दलचे आरोप पुरेसे सिद्ध झालेले आहेत तर, तो अशा कर्मचाऱ्यावर पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शास्ती लादण्याचा व्यवस्थापनाला निदेश देईल.

परंतु, अशा आदेशामुळे बाधित झालेल्या पक्षकारास व व्यवस्थापनास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज संचालक या पोट-कलमान्वये कोणताही आदेश काढणार नाही.

(ब) व्यवस्थापनाने या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार अशा कर्मचाऱ्यांविरुद्ध चौकशी करण्यात हयगय केली असेल किंवा नकार दिला असेल त्याबाबतीत, संचालक व्यवस्थापनाला त्याने असे निदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत अशा कर्मचाऱ्याविरुद्धच्या अशा अभिकथनांची चौकशी करण्याबाबत कारवाई सुरू करण्याचा व अशा तरतुदीनुसार व नियमांनुसार ती पूर्ण करण्याचा निदेश देईल.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (ब) खाली चौकशीच्या कार्यवाहीस प्रारंभ करण्यास आणि नियमाखाली विहित केलेल्या कालावधीमध्ये ती पूर्ण करण्यात व्यवस्थापनाने कसूर केली असेल त्याबाबतीत संचालक स्वत: अशी चौकशी करू शकेल किंवा शिक्षण अधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास अशी चौकशी करण्याचा निदेश देऊ शकेल.

(३) अशी चौकशी करीत असताना, संचालक किंवा त्यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी हे जणूकाही ते अशी चौकशी करण्याच्या प्रयोजनासाठीची चौकशी समितीच आहे असे समजून, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांनुसार चौकशी समितीकडून जी कार्यपद्धती अनुसरली जाते तीच कार्यपद्धती अनुसरतील.

(४) संचालकाने स्वत: अशी चौकशी केल्यावर किंवा चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल मिळाल्यावर गैरवर्तणूक, गैरवर्तन किंवा यथास्थिती नैतिक अध:पतनाचे गंभीर दोषारोप पुरेसे सिद्ध झाले आहेत अशी जर संचालकाची खात्री पटली तर, तो लेखी आदेशाद्वारे, प्रकरणाच्या स्थितीनुसार त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांवर, बडतर्फीची, सेवेतून दूर करण्याची, सेवा समाप्त करण्याची किंवा यथास्थिती पदावनती करण्याची शिक्षा लादण्यात यावी असा व्यवस्थापनाला निदेश देईल.

परंतु, संबंधित कर्मचारी किंवा व्यवस्थापन यांस प्रस्तावित आदेशाच्याविरुद्ध कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय संचालकाकडून असा आदेश काढला जाणार नाही.

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ४ अन्वये कलम ४-अ समाविष्ट करण्यात आले.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(५) पोट-कलम (१) च्या खंड (अ) किंवा पोट-कलम (४) खालील संचालकाचा आदेश व्यवस्थापन आणि कर्मचारी या दोघावर बंधनकारक राहील आणि संचालकांकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीमध्ये व्यवस्थापनाकडून त्यांचे अनुपालन केले जाईल.

खाजगी शाळांच्या व्यवस्थापनावरील विवक्षित आबंधने.

**५.** (१) व्यवस्थापन, खाजगी शाळेतील प्रत्येक स्थायी रिकामे पद, शक्य तितक्या लवकर, विहित करण्यात आलेल्या रीतीने अशा रिकाम्या पदासाठी यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तींची नेमणूक करून भरील :

[१][परंतु, असे रिकामे पद पदोन्नतीद्वारे भरण्यात यावयाचे नसेल तर व्यवस्थापन, असे रिकामे पद भरण्याच्या बाबतीत कार्यवाही करण्यापूर्वी शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, [२][शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद किंवा यथास्थिती, संचालक किंवा तांत्रिक, व्यावसायिक, कलाविषयक किंवा विशेष शिक्षण देणाऱ्या शाळांच्या संबंधात संचालकाकडून पदनिर्देशित करण्यात येईल असा अधिकारी] यांच्याकडून, त्यांनी अन्य शाळांमध्ये समावेशनाकरिता ठेवलेल्या अतिरिक्त व्यक्तींच्या यादीमधून कोणतीही योग्य व्यक्ती उपलब्ध होण्याजोगी आहे किंवा कसे यांची खात्री करून घेईल व अशी कोणतीही व्यक्ती उपलब्ध असेल त्याबाबतीत व्यवस्थापन, त्या व्यक्तींची अशा रिकाम्या पदावर नेमणूक करील.

(२) [३][ [४][सहायक शिक्षक (परिवीक्षाधीन) यांच्या] पदाव्यतिरिक्त एखादे कायम रिकामे पद] भरण्यासाठी नेमणूक करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिवीक्षाधीन असेल. पोट-कलम (३) व (४) च्या तरतुदींना अधीन राहून त्याच्या दोन वर्षाच्या परीवीक्षेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, त्याला कायम करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[५][ परंतु, [ [६][सहायक शिक्षक (परिक्षावीधीन)] म्हणून नेमणूक करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती तीन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल. ]

[७][ (२ अ) पोट-कलमे (३) आणि (४) च्या तरतुदींना अधीन राहून, [८][सहायक शिक्षक (परिक्षावीधीन) यास] तीन वर्षांचा परिवीक्षा कालावधी पूर्ण झाल्यावर, शिक्षक म्हणून नियुक्त आणि कायम करण्यात आल्याचे मानण्यात येईल.]

(३) व्यवस्थापनाच्या मते कोणत्याही परिवीक्षाधीन व्यक्तीचे परिवीक्षाधीन कालावधीतील काम किंवा वर्तन समाधानकारक नसेल तर व्यवस्थापन, त्या व्यक्तीस एक महिन्याची नोटीस [९][ किंवा नोटिशींच्या ऐवजी एक महिन्याचा पगार [१०][किंवा मानधन] ] दिल्यानंतर उक्त कालावधीत कोणत्याही वेळी तिची सेवा समाप्त करू शकेल.

(४) एखाद्या परिवीक्षाधीन व्यक्तींची सेवा पोट-कलम (३) खाली समाप्त करण्यात आल्यास, आणि ज्या दिनांकास तिची सेवा समाप्त करण्यात आली त्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत तिला त्याच शाळेत किंवा व्यवस्थापनाच्या मालकीच्या दुसऱ्या कोणत्याही शाळेत पुन्हा नेमण्यात आल्यास, पोट-कलम (२) च्या प्रयोजनांसाठी परिवीक्षेच्या आवश्यक कालावधीची गणना करण्यासाठी, तिने परिवीक्षाधीन म्हणून आधीच व्यतीत केलेला कालावधी विचारात घेण्यात येईल.

[११][ (४-क) पोट-कलम (१) च्या परंतुकाअन्वये तरतदू केल्याप्रमाणे पदोन्नतीद्वारे किंवा समावेशनाद्वारे कायम रिक्त पद भरण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीस, पोट-कलम (२), (३) किंवा (४) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही. ]

---

[१] सन १९८७ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ५ (अ) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९९० च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ११ (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ११ (क) (एक) द्वारे "शिक्षणसेवकाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ११ (ख) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[६] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ११ (क) (दोन) द्वारे "शिक्षणसेवक" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ११ (ग) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[८] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ११ (ख) द्वारे "शिक्षणसेवकास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[९] सन १९८७ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ५ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१०] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ११ (घ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[११] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, याच्या कलम ५ (ई) अन्वये पोट-कलम (४-क) समाविष्ट करण्यात आले.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(५) व्यवस्थापनाला प्रत्येक अस्थायी रिकामे पद, अशा रिकाम्या पदावर यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून भरता येईल. नेमणुकीचा आदेश, त्या बाबतीत विहित करण्यात आलेल्या नमुन्यामध्ये काढण्यात येईलआणि त्यात अशा व्यक्तीच्या नेमणुकीचा कालावधी नमूद करण्यात येईल.

खाजगी शाळांच्या मुख्याध्यापकावरील आबंधने

**६.** [१] [जर--

(क) एखाद्या खाजगी शाळेच्या प्रमुखाने किंवा त्याने त्या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने,--

(एक) शाळेच्या सर्वसाधारण नोंदवहीत नोंदवलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याच्या जन्म दिनांकात अनधिकृत बदल केला किंवा सर्वसाधारण नोंदवहीत नोंदवलेल्या जन्म दिनांकाहून वेगळा जन्म दिनांक असलेले शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र दिले ; किंवा

(दोन) मान्यताप्राप्त नसलेल्या शैक्षणिक परिसंस्थेतील कोणत्याही विद्यार्थ्याला उप संचालकाच्या लेखी आदेशाशिवाय प्रवेश दिला ; किंवा

(तीन) त्या बाबतीत केलेल्या नियमांचे उल्लंघन करून, स्वेच्छेने किंवा व्यवस्थापनाच्या सांगण्यावरून कोणत्याही विद्यार्थ्याला त्वरित वर्गोन्नती दिली किंवा कोणत्याही विद्यार्थ्याला खालच्या वर्गात ठेवले ; किंवा

(ख) गैरवर्तणूक, कर्तव्यात अक्षम्य हयगय, नैतिक अध:पतन, शाळेचा पैसा किंवा सामग्री यांची अफरातफर या कारणांवरून अथवा परीक्षांच्या बाबतीत हयगय किंवा गैरवर्तणूक अथवा दोन्ही गोष्टी केल्याच्या किंवा जातीय वैमन्यस्य निर्माण केल्याच्या कारणांवरून खाजगी शाळेतील कर्मचाऱ्याला बडतर्फ केले असेल किंवा सेवेतून काढून टाकले असेल किंवा अन्य प्रकारे त्याची सेवा समाप्त केली असेल ; ]

तर संचालक, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, त्या मुख्याध्यापकास किंवा अशा प्राधिकृत व्यक्तीस [२] [किंवा अशा कर्मचाऱ्यास] आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीसाठी ते पद धारण करण्यास मनाई करू शकेल. जर उक्त पाच वर्षाच्या कालावधीनंतर त्या प्रमुखाने किंवा अशा प्राधिकृत व्यक्तीने [२] [किंवा अशा कर्मचाऱ्याने] उपरोक्तपैकी कोणतेही कृत्य पुन्हा केले असल्याचे आढळून आले तर त्याला स्वत:ची बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यानंतर, एखाद्या खाजगी शाळेत असे पद धारण करण्यास संचालक कायमची मनाई करू शकतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणताही आदेश काढल्यानंतर, संचालकास अशा प्रमुखाचे किंवा प्राधिकृत व्यक्तीचे [३] [किंवा कर्मचाऱ्याचे] नाव त्या प्रयोजनासाठी ठेवण्यात आलेल्या काळ्या यादीच्या नोंदवहीत नोंदवण्याची आणि राज्यातील सर्व खाजगी शाळांच्या व्यवस्थापनांना अशा प्रमुखांचे किंवा अशा व्यक्तीचे [३] [किंवा कर्मचाऱ्याचे] नाव कळविण्याची तजवीज करता येईल.

खाजगी शाळांच्या कर्मचाऱ्यांनी राजीनामा देण्याची कार्यपद्धती.

**७.** कोणत्याही खाजगी शाळेतील कोणत्याही कर्मचाऱ्याचा नेमलेल्या दिनांकानंतर कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देण्याचा इरादा असेल तर, तो आपल्या राजीनाम्याच्या दोन प्रती तयार करील आणि त्या दोन्ही प्रतींवर सही करून दिनांक लिहील. नंतर त्याला राजीनाम्याची एक प्रत नोंदणीकृत डाकेने व्यवस्थापनाकडे पाठवता येईल व दुसरी प्रत स्वत:कडे ठेवता येईल.

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ६ (१) (अ) अन्वये "जर एखाद्या खाजगी शाळेच्या" या मजकुराने प्रारंभ होणाऱ्या व "त्वरित वर्गोन्नती दिली" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६ (१) (अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ६ (२) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



**८.** (१) राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे "शाळा न्यायाधिकरण" म्हणून संबोधावयाचे एक किंवा अधिक न्यायाधिकरणे घटित करील आणि प्रत्येक न्यायाधिकरणाची अधिकारिता अशा अधिसूचनेमध्ये निश्चित करील. शाळा न्यायाधिकरणाची घडण.

(२) या न्यायाधिकरणामध्ये राज्य शासनाकडून नेमणूक करण्यात यावयाच्या फक्त एका सदस्याचा अंतर्भाव असेल.

(३) एखादी व्यक्ती,--

(क) दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यापेक्षा कमी दर्जाचे नसलेले न्यायिक अधिकारपद धारण करीत नसेल किंवा तिने ते धारण केलेले नसेल ;

(ख) तिने सात वर्षापेक्षा कमी नसेल इतका काळ अधिवक्ता किंवा न्यायप्रतिनिधी म्हणून व्यवसाय केलेला नसेल ; किंवा

(ग) ती, राज्यातील शासनाचा अवर सचिव, सहायक कामगार आयुक्त किंवा शिक्षण उपसंचालक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे अधिकारपद धारण करीत नसेल किंवा केलेले नसेल ;

तर ती न्यायाधिकरणाचा पीठासीन अधिकारी म्हणून नेमली जाण्यास अर्ह असणार नाही.

(४) न्यायाधिकरणाचा पीठासीन अधिकारी म्हणून करावयाची एखाद्या व्यक्तीची नेमणूक पूर्णकालिक किंवा अंशकालिक तत्त्वावर करता येईल आणि ती राज्य शासन प्रत्येक प्रकरणामध्ये वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे एकूण पाच वर्षापेक्षा अधिक असणार नाही अशा कालावधीसाठी किंवा कालावधींसाठी करता येईल.

(५) पीठासीन अधिकाऱ्याचे पारिश्रमिक आणि सेवेच्या इतर शर्ती राज्य शासनाकडून निर्धारित करण्यात येतील.

(६) न्यायाधिकरणाला या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असलेला लिपिकवर्ग राज्य शासनाकडून त्यास उपलब्ध करून देण्यात येईल.

(७) पीठासीन अधिकाऱ्यास व त्याच्या नियंत्रणाखालील कर्मचारीवर्गास अनुज्ञेय असलेले पारिश्रमिक, निवृत्तीवेतन किंवा भविष्यनिर्वाह निधी अंशदान, रजा भत्ता आणि इतर भत्ते आणि सुविधा यांसाठी होणारा सर्व खर्च राज्याच्या एकत्रित निधीतून भागविण्यात येईल.

(८) न्यायाधिकरणाच्या पीठासीन अधिकाऱ्याचे अधिकारपद तात्पुरते असेल त्याहून अन्यथा रिकामे झाल्यास, राज्य शासन, शक्य असेल तितक्या लवकर, ते रिकामे पद भरण्यासाठी अर्हताप्राप्त अशा दुसऱ्या व्यक्तीची नेमणूक करील. भूतपूर्व पीठासीन अधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेल्या कोणत्याही कार्यवाह्या, अधिकारपद रिकामे झाले त्यावेळी त्या ज्या टप्प्यावर असतील तेथूनच त्याच्या पदीय उत्तराधिकाऱ्याला पुढे चालू करता येतील व त्या निकालात काढता येतील.

**९.** (१) त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा संविदेत काहीही अंतर्भूत असले तरी ;

[१][ (क) व्यवस्थापनाने काढलेल्या आदेशाद्वारे ज्यास बडतर्फ करण्यात आले असेल किंवा नोकरीतून काढून टाकण्यात आले असेल किंवा अन्यथा ज्याची सेवा समाप्त करण्यात आली असेल किंवा ज्याला पदावनत करण्यात आले असेल ; किंवा खाजगी शाळांच्या कर्मचाऱ्यांचा न्यायाधिकरणाकडे अपील करण्याचा हक्क.

(ख) पदोन्नतीद्वारे भरावयाच्या कोणत्याही पदावर नेमणूक करताना ज्याची ज्येष्ठता व्यवस्थापनाकडून डावलण्यात आली असेल ;

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ७ अन्वये "व्यवस्थापनाकडून" या शब्दाने सुरू होऊन "येईल" या शब्दाने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



आणि जो व्यथित झाला असेल अशा, खाजगी शाळेतील कोणत्याही कर्मचाऱ्याला कलम ८ अन्वये घटित केलेल्या न्यायाधिकरणाकडे अपील करण्याचा हक्क असेल व अशा कोणत्याही आदेशाविरुद्ध किंवा ज्येष्ठता डावलण्यात आल्याच्या विरुद्ध त्याला अपील करता येईल ] ;

परंतु, नेमलेल्या दिनांकास सक्षम अधिकारिता असलेल्या एखाद्या न्यायालयाकडून त्यावर निर्णय घेण्यात आला असेल किंवा अशा न्यायालयाकडे जे प्रलंबित अशा कोणत्याही प्रकरणी किंवा बडतर्फीचा, नोकरीवरून काढून टाकल्याचा, अन्यथा सेवा समाप्त केल्याचा किंवा पदावनत केल्याचा आदेश व्यवस्थापनाकडून १ जुलै १९७६ पूर्वी कोणत्याही वेळी देण्यात आला असेल अशा प्रकरणी असे कोणतेही अपील न्यायाधिकरणाकडे दाखल करता येणार नाही.

(२) कर्मचारी, त्यास बडतर्फीचा, नोकरीवरून काढून टाकल्याचा, अन्यथा सेवा समाप्त केल्याचा किंवा यथास्थिती, पदावनत केल्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत न्यायाधिकरणाकडे असे अपील करील :

परंतु, असा आदेश नेमलेल्या दिनांकापूर्वी देण्यात आला असेल त्या बाबतीत, असे अपील उक्त दिनांकापासून साठ दिवसांच्या आत करता येईल.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायाधिकरणास, त्या कालावधीत अपील सादर न करण्यास अपीलकारास पुरेसे कारण होते अशी त्याची खात्री होईल तर, उक्त तीस किंवा यथास्थिति, साठ दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर त्यांच्याकडे करण्यात येणारे अपील दाखल करून घेता येईल.

(४) प्रत्येक अपिलासोबत [१] [पाचशे] रुपये इतकी फी देण्यात येईल, ही फी परत करण्यात येणार नाही, आणि ती राज्याच्या एकत्रित निधीत जमा करण्यात येईल.

न्यायाधिकरणाचे सर्वसाधारण अधिकार व कार्यपद्धती

**१०.** (१) अपिले दाखल करणे, त्यांची सुनावणी करणे आणि ती निकालात काढणे या प्रयोजनासाठी, न्यायाधिकरणास, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खाली अपील न्यायालयामध्ये निहित केलेले अधिकार असतील आणि ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल अशा कोणत्याही आदेशाचे प्रवर्तन त्यास लादणे आवश्यक वाटेल अशा शर्तीवर स्थगित करण्याचाही अधिकार असेल आणि या अधिनियमाद्वारे, किंवा तदन्वये त्यास देण्यात येतील असे इतर अधिकार असतील. १९०८ चा ५.

(२) न्यायाधिकरणाचा पीठासीन अधिकारी, न्यायाधिकरणाच्या बैठकीचे ठिकाण, किंवा ठिकाणे व ज्यावेळेमध्ये बैठक होईल ती वेळ यांसह, न्यायाधिकरणाने, आपले कामकाज निकालात काढण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ठरवील.

(३) प्रत्येक अपीलावर शक्य तितक्या लवकर निर्णय घेण्यात येईल. प्रत्येक प्रकरणी व न्यायाधिकरणास अपील मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत, त्यावर निर्णय घेण्यासाठी न्यायाधिकरणाकडून शिकस्त करण्यात येईल. या कालावधीत अपील निकालात काढण्यास न्यायाधिकरण असमर्थ असेल त्या बाबतीत, ते याबाबतची कारणे आपल्या अभिलेखामध्ये नमूद करील.

योग्य तो अनुतोष व निदेश देण्याचे न्यायाधिकरणाचे अधिकार

**११.** (१) अपील मिळाल्यावर, दोन्ही पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, कलम ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही गोष्टीशी अपील संबंधित नाही, किंवा ते त्यांच्याकडून चालविता येण्यासारखे नाही, किंवा व्यवस्थापनाच्या आदेशात हस्तक्षेप करण्यासाठी कोणतेही पुरेसे कारण नाही अशी न्यायाधिकरणाची खात्री झाल्यास, त्यास ते फेटाळता येईल.

(२) दोन्ही पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, न्यायाधिकरण अपिलावर जर असा निर्णय देईल की, बडतर्फीचा, नोकरीवरून काढून टाकल्याचा, अन्यथा सेवा समाप्तीचा किंवा पदावनतीचा आदेश हा त्या

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम २ अन्वये "पन्नास" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचे (या अधिनियमान्वये करण्यात आलेले कोणतेही नियम धरून) किंवा संविदेचे किंवा सेवेच्या शर्तीचे उल्लंघन करून करण्यात आला होता किंवा अन्यथा बेकायदेशीर अथवा अयोग्य होता तर, न्यायाधिकरणास, व्यवस्थापनाचा आदेश अंशतः किंवा पूर्णतः अपास्त करता येईल व ते व्यवस्थापनास पुढीलप्रमाणे निदेश देऊ शकेल,--

(अ) ते विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे कर्मचाऱ्यास त्याच पदावर किंवा खालच्या पदावर पुनःस्थापित करणे ;

(ब) ते विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे, त्या कर्मचाऱ्याला पदावनत करण्यापूर्वी तो ज्या दर्जाच्या पदावर होता त्याच पदावर किंवा कोणत्याही खालच्या दर्जावर पुनःस्थापित करणे ;

(क) ते विनिर्दिष्ट करील त्या कालावधीकरिता त्या कर्मचाऱ्यास वित्तलब्धीची थकबाकी देणे ;

(ड) बडतर्फी, नोकरीवरून काढून टाकणे, अन्यथा सेवा समाप्ती किंवा यथास्थिती, पदावनती याऐवजी ते विनिर्दिष्ट करील अशी दुसरी कमी शिक्षा देणे ;

(इ) कर्मचाऱ्यास पुनःस्थापित न करण्याचे ठरविले असेल त्याबाबतीत किंवा इतर कोणत्याही योग्य प्रकरणी, नोकरी गमावणे आणि त्यानंतर योग्य नोकरी मिळण्याची किंवा न मिळण्याची शक्यता याचा विचार करून भरपाईच्या स्वरूपात, त्या न्यायाधिकरणास विनिर्दिष्ट करता येईल अशी, [१] [कर्मचाऱ्यास तो दहा वर्षे किंवा त्याहून अधिक काळ शाळेच्या सेवेत असेल तर बारा महिन्यांचा पगार (वेतन व भत्ते, कोणतेही असल्यास), आणि दहा वर्षापेक्षा कमी काळ शाळेच्या सेवेत असेल तर सहा महिन्यांचा पगार (वेतन व भत्ते, कोणतेही असल्यास), देणे. ] ; किंवा

(फ) प्रकरणाच्या परिस्थितीचा विचार करून, कर्मचाऱ्यास ते विनिर्दिष्ट करील असा इतर अनुतोष देणे आणि अशा इतर शर्तीचे पालन करणे.

(३) कर्मचाऱ्यास द्यावयाची रक्कम म्हणून यायाधिकरणाने निदेशित केलेली कोणतीही देय रक्कम किंवा कर्मचाऱ्यास पुनःस्थापित करण्याच्या आदेशाच्या बाबतीत, तो पुनःस्थापित होईपर्यंत त्यास द्यावयाची कोणतीही रक्कम ही व्यवस्थापनाला देय व चुकते करण्याजोगे असणाऱ्या अनुदानातून वजा करण्यात यावी आणि ती थेट त्या कर्मचाऱ्यास देण्यात यावी अशी शिफारस न्यायाधिकरणाने राज्य शासनास करणे हे विधिसंमत असेल.

(४) पोट-कलम (२) अन्वये न्यायाधिकरणाने दिलेला कोणताही निदेश दोही पक्षांना लेखी कळविण्यात येईल आणि निदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत व्यवस्थापन त्याचे अनुपालन करील. हा कालावधी, व्यवस्थापनाला निदेश मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांहून कमी नसेल.

न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम व बंधनकारक असणे.

**१२.** त्या त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा संविदेत काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायाधिकरणाने दाखल करून घेतलेल्या व निकालात काढलेल्या अपीलावरील त्याचा निर्णय अंतिम असेल, आणि त्या कर्मचाऱ्यास व व्यवस्थापनास बंधनकारक असेल, आणि न्यायाधिकरणाने निर्णय दिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या बाबतीत, कोणत्याही न्यायालयापुढे किंवा दुसऱ्या कोणत्याही न्यायाधिकरणापुढे किंवा प्राधिकरणापुढे, कोणताही दावा, अपील किंवा इतर कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ८ अन्वये "सहा महिन्यांच्या वित्तलब्धीपेक्षा जास्त असणार नाही, अशी रक्कम कर्मचाऱ्यास देणे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



न्यायाधिकरणाच्या निदेशांचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल व्यवस्थापनास शास्ती.

**१३.** (१) व्यवस्थापनाने कोणत्याही वाजवी कारणाशिवाय [१] [ कलम ११ खाली, न्यायाधिकरणाने दिलेला कोणताही निदेश किंवा कलम ४-अ च्या पोट-कलम (१) चा खंड (अ) किंवा पोट-कलम (४) खाली संचालकाकडून काढण्यात आलेला कोणताही आदेश यांचे अशा निदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेला किंवा, यथास्थिति, कलम ४-अ च्या पोट-कलम (५) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत किंवा, यथास्थिति, न्यायाधिकरण अथवा संचालक यांच्याकडून संमत करण्यात येईल. अशा वाढीव कालावधीत ] पालन करण्यात कसूर केल्यास त्यास अपराधसिद्धी नंतर,--

(क) पहिल्या अपराधासाठी, [२] [पंधरा दिवसांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा होतील] ;

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयात नमदू करावयाची एतद्‌विरुद्ध विशेष आणि पुरेशी कारणे नसतील तर, हा दंड [३] [दहा हजार रुपयांहून] कमी असणार नाही आणि ;

(ख) दुसऱ्या आणि त्यानंतरच्या अपराधासाठी, [४] [पंधरा दिवसांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा] पंच्याहत्तर हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा होतील] ;

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयात नमूद करावयाची एतद्‌विरुद्धची विशेष व पुरेशी कारणे नसतील तर, हा दंड [५] [वीस हजार रुपयांहून] कमी असणार नाही.

(२) (क) या कलमान्वये अपराध करणारे व्यवस्थापन, हे, कोणतीही सोसायटी असेल तर अपराध घडला त्यावेळी सोसायटीची प्रभारी असणारी आणि सोसायटीचा कारभार चालविण्याबद्दल जबाबदार असणारी प्रत्येक व्यक्ती, तसेच सोसायटीदेखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा होण्यास ते/ती पात्र असेल ;

परंतु, कोणत्याही व्यक्तीने असा अपराध हा, तिच्या नकळत घडलेला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केल्यास, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(ख) खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या सोसायटीकडून अपराध घडला असेल व असा अपराध, सोसायटीचा कोणताही अध्यक्ष, सभापती, सचिव, सदस्य, प्रमुख किंवा व्यवस्थापक किंवा इतर अधिकारी अथवा कर्मचारी यांच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्याने घडलेला आहे किंवा त्याच्या कोणत्याही हयगयीशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा असेल तर, असा संबंधित अध्यक्ष, सभापती, सचिव, सदस्य, प्रमुख किंवा व्यवस्थापक किंवा इतर अधिकारी अथवा कर्मचारी हा, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व त्यानुसार त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा होण्यास तो पात्र असेल.

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ९ अन्वये "कलम ११ अन्वये" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "अशा आणखी कालावधीत" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम २ (१) (अ) अन्वये "एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ (१) (ब) अन्वये "पाचशे रुपयांहून" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (अ) अन्वये "दोन हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (ब) अन्वये "पाचशे रुपयांहून" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



**स्पष्टीकरण.--**या कलमाच्या प्रयोजनार्थ "सोसायटी" याचा अर्थ, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी करण्यात आलेली सोसायटी किंवा [१][महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम] अन्वये नोंदणी करण्यात आलेली सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था किंवा इतर कोणताही निगमनिकाय असा आहे व यामध्ये ज्यांच्या व्यवस्थापनाखाली एक किंवा अधिक खाजगी शाळा चालविण्यात येतात अशा संघटनेच्या किंवा व्यक्तीच्या निकायाचा-मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो--अंतर्भाव असेल.

१८६० चा २१. १९५० चा मुंबई २९.

**१४.** त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी विधि व्यवसायीस [२][संचालकाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या] विशेष परवानगीशिवाय कोणत्याही पक्षकाराच्या वतीने कोणत्याही कामकाजासंबंधात [२][संचालकापुढे किंवा न्यायाधिकरणापुढे] उपस्थित राहण्याचा हक्क असणार नाही.

विधि व्यवसायींना उपस्थित राहण्यापासून वगळणे.

[३][परंतु, अपीलकाराला त्यांची तशी इच्छा असेल तर, त्याच किंवा इतर कोणत्याही खाजगी शाळेत कर्मचारी असलेल्या त्यांच्या पसंतीच्या इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत संचालक किंवा न्यायाधिकरण यांच्यासमोर अभिवेदन करण्याची अनुमती असेल असा प्रतिनिधी त्याच्या शाळेच्या व्यवस्थापनाकडून तसे करण्याची परवानगी मिळवील.]

**१५.** [४][ **** ] जी अपिले माध्यमिक शाळा संहितेअनुसार विभागाकडे किंवा यथास्थिती, संचालककाकडे किंवा त्यास अधीन असणाऱ्या अधिकाऱ्याकडे प्रलंबित असतील अशी कलम ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींशी संबंधित असणारी खाजगी शाळांच्या कर्मचाऱ्यांची [५] [किंवा यथास्थिति, व्यवस्थापनांची] सर्व अपिले न्यायाधिकरणाकडे [६][****] हस्तांतरित करण्यात येतील. न्यायाधिकरण अशा प्रत्येक अपिलासंबधात जणू काही ते अपील कलम ९ अन्वये करण्यात आले असावे त्याप्रमाणे त्याची सुनावणी करील व ते निकालात काढील. परंतु, असा कर्मचारी किंवा [७][यथास्थिति व्यवस्थापन] रु. ५० एवढी विहित फी, न्यायाधिकरणाने त्या प्रयोजनार्थ दिलेली नोटीस कर्मचाऱ्यास मिळाल्यापासून एक महिन्याचा आत देईल.

प्रलंबित अपिले न्यायाधिकरणाकडे हस्तांतरित करणे.

[८][परंतु, विभाग किंवा संचालक किंवा त्याचा दुय्यम अधिकारी यांनी हा अधिनियम अमलात आल्याच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) अधिनियम, १९८७ याच्या प्रारंभाच्या दिनांकाला संपणाऱ्या कालावधीत मुंबई उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार निर्णय दिलेल्या अशा कोणत्याही अपिलाबाबत, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी विभाग किंवा संचालक किंवा त्याचा दुय्यम अधिकारी, यांना त्याबाबतीत निर्णय देण्याचा अधिकार होता असे समजून, विधिग्राह्यरीत्या निर्णय देण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.]

१९८७ चा महा. ३०

---

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, अनुसूची नोंद क्र. ४३ अन्वये "मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०" याऐवजी दाखल केले.

[२] सन १९८७ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम १० (अ) अन्वये "न्यायाधिकरणाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर त्यांच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १० (ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ३ (अ) अन्वये "नेमलेल्या तारखेस" हे शब्द वगळण्यात आले.

[५] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ११ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला आणि तो नेहमीकरता समाविष्ट केला आहे असे मानण्यात येईल.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ११ (ब) अन्वये "ते स्थापन होताच त्याच्याकडे" हा मजकूर वगळण्यात आला. तो नेहमीसाठी वगळण्यात आला असे मानण्यात येईल.

[७] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ३ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ११ (अ) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



[1] [**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनासाठी,--

(क) कलम ९, पोट-कलम १ च्या खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधातील कर्मचाऱ्यांची किंवा यथास्थिति, व्यवस्थापनाची अपिले ; आणि

(ख) कलम ९ चे पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधातील कर्मचाऱ्यांची किंवा यथास्थिति, व्यवस्थापनाची अपिले ;

याचा अर्थ, अनुक्रमे विभाग किंवा संचालक किंवा त्यास दुय्यम असलेला अधिकारी यांच्यासमोर यथास्थिति, नियत दिनांकापासून आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) अधिनियम, १९८७ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून प्रलंबित असलेली अपिले असा आहे.] १८७ चा महा. ३०.

नियम **१६.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः व पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल :--

(क) खाजगी शाळांच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाप्रवेशासाठी (त्यासंबधीची कार्यपद्धती धरून) किमान अर्हता ;

(ख) त्यांची वेतनमाने व भत्ते ;

(ग) त्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे व इतर लाभ ;

(घ) रजा, नियतसेवावधी, फेरनेमणूक व पदोन्नती यांसह अशा कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या इतर शर्ती ;

(ड) अशा कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व आचारसंहिता व शिस्तविषयक बाबी ;

(च) चौकशीचे कामकाज चालविण्याची रीत ;

(छ) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

[2] [ (२-अ) खंड (अ) ते (ड) अन्वये नियम तयार करण्याबाबत पोट-कलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांमध्ये, नियमाना किंवा त्यापैकी कोणत्याही नियमाला भूतलक्षी प्रभाव देण्याच्या अधिकाराचा समावेश असेल ; पण असा नियम जिला लागू असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या हितसंबंधावर बाधक परिणाम होईल अशा प्रकारे कोणत्याही नियमाला कोणताही भूतलक्षी प्रभाव देण्यात येणार नाही. ]

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेले सर्व नियम, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असतील.

(४) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असले तितक्या लवकर, राज्य विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि उपरोक्तप्रमाणे, ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा

---

[1] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ३ (अ) अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले आणि ते नेहमीकरिता दाखल केले असल्याचे मानण्यात येईल.

[2] सन १९८७ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम १२ अन्वये पोट-कलम (२-अ) समाविष्ट करण्यात आले आणि ते नेहमीकरिता समाविष्ट केले होते असे मानण्यात येईल.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच तो नियम अंमलात येईल किवा यथास्थिति, अमलात येणार नाही ; तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---------------

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

एच ४८२-(४,६६४ पु.)-११.२०१५

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते